## विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, १९९९ - विदेश प्रवास
## ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. १९ (ऑक्टोबर ३०, २०००)

भारतीय रिझर्व बँक
चलन नियंत्रण विभाग
मध्यवर्ती कार्यालय
मुंबई ४०० ००१

ए.पी.(डीआयआर मालिका) परिपत्रक क्र. १९

ऑक्टोबर ३०, २०००

प्रति,
विदेशी चलनाचे सर्व अधिकृत डिलर्स

माननीय महोदय,

**विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, १९९९ - विदेश प्रवास**

अधिकृत डिलर्सचे लक्ष भारत सरकारच्या विदेशी चलन व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम, २००० अधिसूचित करणाऱ्या अधिसूचना क्र. जीएसआर ३८१(इ) दिनांक ३ मे २००० च्या अधिसूचनेकडे वेधण्यात येत आहे, ज्यानुसार काही चालू खात्यातील व्यवहारांसाठी चलन काढण्यास मनाई करण्यात आली आहे आणि अन्य काही व्यवहारांवर बंधने घालण्यात आली आहेत. नियम ५ नुसार अधिसूचनेला अनुसूची ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यवहारांसाठी रिझर्व बँकेची पूर्वानुमति आवश्यक आहे. त्यानुसार अधिकृत डिलर्सनी विदेश प्रवासाशी संबंधित विदेशी चलनाच्या विमोचनाच्या अर्जांच्या बाबतीत या परिपत्रकाला जोडपत्रातील आदेशांचे अनुसरण करावे.
२. हे स्पष्ट करण्यात येत आहे कि, जोडपत्रातील आदेश भारत सरकार, वित्त मंत्रालय यांच्या उक्त संदर्भित अधिसूचना दिनांकित ३ मे २००० अन्वये अधिसूचित केलेल्या नियमांसह वाचावेत.
३. भारत सरकारची अधिसूचना क्र. जीएसआर ३८१(इ) दिनांक ३ मे २००० च्या नियम (२) च्या कलम (बी) नुसार "काढणे" मध्ये आंतरराष्ट्रीय क्रेडीट कार्डस, आंतरराष्ट्रीय डेबीत कार्डस, एटीएम कार्डस वगैरेंच उपयोग समाविष्ट आहे. म्हणून येथे स्पष्ट करण्यात येत आहे कि, या साधनांचा उपयोग सुध्दा अधिसूचनेतील बंधनाच्या अधीन असेल. त्यापुढे, विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम २ च्या कलम (एच) नुसार "चलन", मध्ये इतर बाबींबरोबरच, आंतरराष्ट्रीय क्रेडीट कार्डसचाहि समावेश होतो. रिझर्व बँकेने आपल्या अधिसूचना क्र. एफइएमए १५/आरबी-२००० दिनांक ३ मे २००० अन्वये एटीएम कार्डस आणि डेबीट कार्डस सुध्दा "चलन" म्हणून अधिसूचित केली आहेत. त्यानुसार क्रेडिट कार्डस, एटीएम कार्डस आणि डेबीट कार्डस वगैरेद्वारे केलेल्या प्रदानानासुध्दा, केवळ प्रदानाची पध्दत वेगळी असल्याने, अधिनियमा अधीन निर्गमित केलेले नियम, नियमने आणि आदेश क्रेडिट कार्डस, एटीएम कार्डस आणि डेबीट कार्डस वगैरेनासुध्दा लागू होतील. हे स्पष्ट करण्यात येत आहे कि, खाजगी भेटीव्यतिरिक्त अन्य कारणाने विदेशी जाणाऱ्या व्यक्तिच्या बाबतीत अशा प्रवासासाठी विकलेल्या विदेशी चलनाच्या रकमेची नोंद प्रवाशाच्या पारपत्रावर करणे **बंधनकारक नाही.** तथापि, विदेशी चलन जर खाजगी भेटीसाठी म्हणजे बेसिक ट्रॅव्हल कोटा (बीटीक्यू) चा उपयोग करण्यासाठी विकले असेल तर ते न चुकता अधिकृत डिलरच्या शिक्क्याखाली सही आणि तारखेसह प्रवाशाच्या पारपत्रावर नोंदवावे.

**५. आगाऊ रवानगी**

ज्या कारणासाठी विदेशी चलनाच्या विमोचनाला परवानगी आहे त्यासाठी अधिकृत डिलर कोणत्याहि चालू खात्यावरील व्यवहारासाठी आगाऊ रवानगीची रक्कम युएस डॉलर २५००० किंवा त्याच्या सममूल्यापेक्षा अधिक नसेल तर आगाऊ रवानगी करू शकतो. जेव्हा रक्कम युएस डॉलर २५००० पेक्षा अधिक असेल तेव्हा, समुद्रपार लाभार्थीकडून भारताबाहेरील आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या बँकेकडील हमी, किंवा भारतातील अधिकृत डिलरकडील हमी जर अशी हमी, भारताबाहेरील आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेच्या बँकेकडील प्रति-हमी समक्ष देण्यात आली असेल तर, प्राप्त करण्यात यावी. अधिकृत डिलरने आगाऊ रवानगीच्या लाभार्थीने भारतातील रवानगी करणाऱ्याशी करार किंवा कंत्राटाअधीन कर्तव्ये पूर्ण केली आहेत याची खात्री करण्यासाठी पाठपुरावाहि करावा.

६. या परिपत्रकाच्या जोडपत्रातील आदेश चलन नियंत्रण मॅन्युअल (१९९३ आवृत्ती) च्या प्रकरण ८ च्या भाग ए मधील आणि त्याची जोडपत्रे १, २ आणि ३ ची जागा घेतील.
७. अधिकृत डिलरनी त्यांच्या संबंधित घटकांच्या नजरेला आ परिपत्रकातील विषय आणावेत.
८. या परिपत्रकातील आदेश विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम १९९९ (१९९९ चा ४२) च्या कलम १० (४) आणि कलम ११(१) च्या अधीन निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशांचे कोणत्याहिप्रकारे उल्लंघन किंवा भंग अधिनियमाअधीन विहित केल्यानुसार दंडनीय असेल.

आपला विश्वासू
**के.जे.उदेशी**
मुख्य महाव्यवस्थापक
**जोडपत्र**

**विदेश प्रवास**

**ए.१ सर्वसाधारण**

भारतातील निवासी व्यक्तिला विदेश प्रवासासाठी विदेशी चलनाच्या विमोचनासाठी अधिकृत डिलर्सनी विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम,१९९९ च्या कलम ५ अधीन केलेल्या नियमांचे मार्गदर्शन घ्यावे. सरकारी अधिसूचना क्र. जीएसआर ३८१ (इ) दिनांक ३ मे २००० च्या नियम ३ च्या बाब (बी) नुसार, नेपाळ आणि भूतान मध्ये प्रवास करण्यासाठी विदेशी चलनाचे विमोचन करण्यासाठी परवानगी नाही. अधिसूचनेच्या अनुसूचि ३ मधे निर्दिष्ट केल्याप्रमाणे, काही मर्यादेच्या बाहेरील विदेशी चलनाच्या विमोचनासाथी रिझर्व बँकेची पूर्वानुमति आवश्यक आहे. सरकारी अधिसुचनेच्या अनुसूचि ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या मर्यादेच्या बाहेरील विदेशी चलनाच्या विमोचनासाठीचे सर्व अर्ज अर्जदार ज्या चलन नियंत्रण विभागाच्या अधिकारितेत कार्यरत असेल/रहात असेल त्याच्या विभागीय कार्यालयाकडे संदर्भित करावेत.

**ए.२ चलनाची विक्री**

(अ) जेथे रिझर्व बँकेने/भारत सरकारने परवाने/मंजूरी दिली आहे, विदेशी चलन परवान्यात/मंजूरीत दिलेल्या वैधतेच्या कालावधीत विदेशी चलन विकता येईल आणि विक्रीची नोंद परवान्याच्या/मूळ मंजूरीच्या मागील बाजूस करावी.

(ब) खाजगी भेटीव्यतिरिक्त अन्य कारणाने विदेशी जाणाऱ्या व्यक्तिच्या बाबतीत अशा प्रवासासाठी विकलेल्या विदेशी चलनाच्या रकमेची नोंद प्रवाशाच्या पारपत्रावर करणे **आवश्यक नाही.** तथापि, विदेशी चलन जर खाजगी भेटीसाठी विकले असेल तर ते **न चुकता** अधिकृत डिलरच्या शिक्क्याखाली सही आणि तारखेसह प्रवाशाच्या पारपत्रावर नोंदवावे.

टिपः

*अ. अधिकृत डिलरने खाजगी भेटीव्यतिरिक्त अन्य कारणासाठी विदेश करण्यासाठी विदेशी चलन विकले असल्यास, प्रवाशाने विनंती केल्यास, डिलरच्या शिक्क्याखाली सही आणि तारखेनिशी त्याची नोंद करावी.*

*ब पालकांच्या पारपत्रावर अपत्य प्रवास करीत असेल तर, संयुक्त पारपत्रावर नोंद करावी.*

(क) ट्रॅव्हलर्स धनदेशांच्या निर्गमनाच्या बाबतीत, प्रवाशाने प्राधीकृत अधिकाऱ्यासमक्ष सही करावी आणि ट्रॅव्हलर्स धनदेशाच्या खरेदीची प्रवाशाची पोंचपावती नीट जपून ठेवावी.

(ड) प्रवाशाला विकलेल्या एकूण विदेशी चलनापैकी खाली निर्देशिलेल्या मर्यादेत चलनी नोटा आणि नाण्यांच्या स्वरूपात विदेशी चलन विकावेः

| | | |
|---|---|---|
| १ | इराक, लिबिया, इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण, रशियन फेडरेशन आणि स्वतंत्र राष्ट्रांच्या राष्ट्रकूलाच्या अन्य प्रजासत्ताकां व्यतिरिक्त अन्य देशात जाणाऱ्या प्रवाशाना | युएस डॉलर ५०० किंवा त्याच्या सममूल्यापेक्षा अधिक नाही; |
| २ | इराक किंवा लिबियाला जाणाऱ्या प्रवाशाना | युएस डॉलर ५००० किंवा त्याच्या सममूल्यापेक्षा अधिक नाही; |
| ३ | इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण, रशियन फेडरेशन आणि स्वतंत्र राष्ट्रांच्या राष्ट्रकूलाच्या अन्य प्रजासत्ताकांत प्रवाशाना | पूर्ण विदेशी चलनाचे विमोचन करावे. |

(इ) विदेश प्रवासासाठी विदेशी चलनाच्या विक्रीच्या संबंधातील फॉर्म ए२ अन्य कागदपत्रांसह अधिकृत डिलर्सनी त्यांच्या अंतर्गत लेखा परिक्षकांच्या पडताळणीसाठी एक वर्ष जपून ठेवावेत.

**ए.३** विदेशी गेल्यानंतर आजारी पडलेल्या व्यक्तिला त्याच्या भारताबाहेरील वैद्यकीय उपचारांसाठी भारत सरकारच्या अधिसूचना क्र. जीएसआर ३८१(इ) दिनांक ३ मे २००० च्या नियम ५ नुसार विदेशी चलनाचे विमोचन करता येईल.

**ए.४ सांस्कृतिक सहली**

डान्स ट्रूप्स, कलावंत वगैरे ज्याना सांस्कृतिक हेतूने विदेश सहल करायची असेल त्यानी विदेशी चलनाच्या गरजेसाठी शिफारस करण्यासाठी भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडे (शिक्षण आणि संस्कृती विभाग ) अर्ज करावा. अधिकृत डिलर्स मंत्रालयाच्या मंजूरीच्या आधारे त्यात निर्देशित मर्यादेच्या आणि अटींच्या अधीन विदेशी चलनाचे विमोचन करावे.

**ए.५ खाजगी सहली**

कोणत्याहि व्यक्तिला कोणत्याहि हेतूने विदेश प्रवास करण्यासाठी खाजगी भेटीसाठीसुध्दा विदेशी चलनाचे विमोचन करता येईल.

**ए.६ काही प्रकरणात विदेशी चलनाच्या योग्य उपयोगासाठी पाठपुरावा**

जेथे अधिकृत डिलरने अंदाजित खर्चाच्या आधारे विदेशी चलनाचे विमोचन केले असेल, उदाः विदेशात वैद्यकीय उपचार किंवा वैद्यकीय तपासणी वगैरे अधिकृत डिलरने अर्जदार भारतात परतल्यानंतर पंधरवड्याच्या आत अधिकृत डिलरच्या ज्या शाखेने विदेशी चलनाचे विमोचन केले असेल तिला प्रत्यक्ष खर्चाचे विवरण न चुकता सादर करील याची खात्री करण्यासाठी पाठपुरावा केला पाहिजे. असे विवरण सादर न केल्यास अर्जदार रिझर्व बँकेच्या ज्या विभागीय कार्यालयाच्या अधिकारितेत रहात असेल तिथे कळवावे.

**ए.७ विदेशी चलन परत करण्यासाठी कालावधी**

कोणत्याहि हेतूसाठी खरेदी केलेले विदेशी चलन त्या हेतूने किंवा एफइएमए १९९९ च्या तरतूदीअधीन किंवा त्याअधीन नियम किंवा नियमनांखाली विदेशी चलनाने प्राप्त करण्यासाठी अनुज्ञेय असलेल्या हेतूने न वापरल्यास ते किंवा न वापरलेला हिस्सा त्याच्या खरेदीच्या तारखेपासून ६०(साठ) दिवसांच्या आत अधिकृत व्यक्तिला परत करणे आवश्यक आहे. (सीएफ. अधिसूचना क्र. एफइएमए ९/२०००-आरबी दिनांक ३ मे २०००)

**टीपः** *जर एखादी व्यक्ति ६० दिवसांनंतर अधिकृत डिलरकडे विदेशी चलन परत करण्यास आली तर अधिकृत व्यक्तिने ते विहीत ६० दिवसाचा कालावधी उलटून गेल्याच्या कारणास्तव खरेदी करण्याचे* ***नाकारू नये.***

**ए. ८ खर्च न केलेले विदेशी चलन**

प्रवाशाने खर्च न केलेले विदेशी चलन भारतात परत आणल्यास ते चलनी नोटांच्या स्वरूपात असल्यास त्याने परतल्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत रुपयातील प्रदानासमक्ष परत केले पाहिजे. असे चलन जर ट्रॅव्हलर्स धनादेशांच्या स्वरूपात असेल तर परतल्याच्या तारखेपासून १८० दिवसांच्या आत ते अधिकृत व्यक्तिकडे परत केले पाहिजे. असे परत आणलेले विदेशी चलन तो प्रवासी उक्त निर्दिष्ट कालावधीत नंतरच्या विदेश भेटीसाठी वापरू शकतो. तथापि, परत आलेल्या प्रवाशाला, एकूण युएस डॉलर २००० पर्यंतच्या रकमेच्या नोटा आणि ट्रॅव्हलर्स धनादेश आणि कोणत्याहि मर्यादेविना नाणी स्वतःजवळ ठेवता येतील. (सीएफ. अधिसूचना क्र. एफइएमए ११/२०००-आरबी दिनांक ३ मे २०००) अशा प्रकारे ठेवलेले विदेशी चलन तो प्रवासी पुढच्या विदेश प्रवासासाठी वापरू शकतो.

**टीपः** *जर एखादी व्यक्ति विहीत कालावधीनंतर अधिकृत डिलरकडे विदेशी चलन परत करण्यास आली तर अधिकृत व्यक्तिने ते विहीत ६० दिवसाचा कालावधी उलटून गेल्याच्या कारणास्तव खरेदी करण्याचे* ***नाकारू नये.***

**ए.९ सहलीची व्यवस्था वगैरेसाठी रकमेची रवानगी**

(१) अधिकृत डिलर्स, प्रवाशाच्या विनंतीवरून तो भेट देणार असलेल्या देशातील त्याच्या हॉटेल निवास, सहल व्यवस्था वगैरेसाठी, काही योग्य मर्यादेपर्यंत विदेशी चलनाची रवानगी करू शकतो, जर ते प्रवाशाने अदिकृत व्यक्तिकडून लागू असलेल्या नियमांच्या, नियमनांच्या आणि आदेशांच्या अनुसार खरेदी केलेल्या विदेशी चलनापैकी ( खाजगी भेटीसाठी काढलेल्या विदेशी चलनासह ) असेल.

(२) अधिकृत डिलर्स विदेशातील हॉटेल्स/एजन्टस वगैरेशी भारतातील प्रवाशांसाठी हॉटेल निवासची व्यवस्था, किंवा अन्य सहलीच्या व्यवस्था करण्यासाठी सामंजस्याचा करार असलेल्या भारतातील एजन्टच्या विनंतीवरून, संबंधित प्रवाशाने अधिकृत व्यक्तिकडून लागू असलेल्या नियमांच्या, नियमनांच्या आणि आदेशा च्या अनुसार खरेदी केलेल्या विदेशी चलनापैकी (खाजगी भेटीसाठी काढलेल्या चलनासह) ते चलन असल्याबदल अधिकृत डिलरचे जर समाधान झाले तर रक्कम रवाना करू शकतो.

(फ) (३) ) अधिकृत डिलर्स विदेशातील हॉटेल्स/एजन्टस वगैरेशी भारतातील प्रवाशांसाठी हॉटेल निवासची व्यवस्था, किंवा अन्य सहलीच्या व्यवस्था करण्यासाठी सामंजस्याचा करार असलेल्या भारतातील एजन्टच्या नावे विदेशी चलन खाते उघडू शकतो, जर

(अ) खात्यात होणारी जमा जर,

(१) प्रवाशाकडून जमा करण्यात आलेली विदेशी चलनातील रक्कम आणि

(२) बुकिंग/सहल व्यवस्था वगैरे रद्द झाल्यापोटी भारताबाहेरून प्राप्त झालेला परतावा; आणि

(ब) विदेशी चलनातील डेबीट रक्कम, वरील (२) प्रमाणे भारताबाहेरील हॉटेल निवास, सहल व्यवस्था वगैरेच्या प्रदानाप्रती असेल.

**ए.१० रुपयातील प्रदाने**

अधिकृत डिलर्स रु. ५००००/-(रुपये पन्नास हजार मात्र) पर्यंतची रोख रक्कम विदेश प्रवासासाठी विदेशी चलनाच्या विक्रीसमक्ष स्वीकारू शकतो. जेव्हा जेव्हा विदेशी चलनाची विक्री रु.५०००० पेक्षा अधिक असेल तेव्हा प्रदान केवळ (१) अर्जदाराच्या बँक खात्यावर काढलेल्या रेखांकित धनादेशाद्वारे, किंवा (२) अर्जदाराची भेट प्रायोजित करणाऱ्या फर्म/कंपनीच्या बँक खात्यावर काढलेल्या रेखांकित धनादेशाद्वारे, किंवा (३) बँकरचा धनादेश/प्रदानादेश/धनप्रेष द्वारे स्वीकारावी.

टीपः *ज्या बाबतीत एका एकमेव काढण्यातील किंवा एकाच भेटीसाठी/प्रवासासाठी एकाहून अधिक काढलेली रक्कम जेव्हा एकच समजली जाते तेव्हा विदेशी चलनाचे रुपयातील सममूल्य रु. ५०००० पेक्षा अधिक असेल ती रक्कम वर स्पष्ट केल्याप्रमाणे धनादेश किंवा धनप्रेष द्वारेच स्वीकारावी.*